दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -९९ रविवार,दि.१५ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-99 | Sunday, Dt.15 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4



नवी दिल्ली - येथे केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयातील सहसचिव नवलकिशोर राम यांची भेट घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी देशातील पहिल्या दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट देऊन वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपये सूट देण्यात यावी याबाबत सविस्तर चर्चा केली.

# आज मंत्र्यांचा शपथविधी!

## अजित पवारांच्या पहिल्या मंत्र्याचे नाव समोर








## नरहरी झिरवाळ यांना सुनील तटकरेंचा शपथविधीसाठी फोन, कुटुंबासमवेत हजर राहण्याचा निरोप

मुंबई /वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नरहरी झिरवाळ यांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंत्रिपदाच्या शपथविधीसाठी फोन केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नरहरी झिरवाळ यांचे नाव मंत्रिपदासाठी निश्चित झाल्याचे म्हटले जात आहे. रविवारी नागपूरमध्ये मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. यावेळी नरहरी झिरवाळ मंत्रिपदाची शपथ घेतील. अजित पवार यांनी ५ डिसेंबर रोजी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. तर आता नरहरी झिरवाळ यांच्या निमित्ताने राष्ट्रवादीच्या दुसऱ्या मंत्र्यांचे नाव समोर आले आहे.

नरहरी झिरवाळ यांनी २०१९- २०२४ या काळात विधानसभेच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळलेली आहे. यापूर्वी त्यांनी मंत्रिपदाची इच्छा बोलून दाखवली होती. त्यानुसार रविवारी होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून पहिले नाव नरहरी झिरवाळ यांचे पुढे येत आहे.

अजित पवार यांनी आपल्या मंत्र्यांची यादी फायनल करत मुख्यमंत्री फडणवीसांना सोपवली होती. त्यानंतर आज सायंकाळी सुनील तटकरे यांनी नरहरी झिरवाळ यांना मंत्रीपदासाठी फोन केला. त्यांनी कुटुंबासमवेत

(उर्वरीत पान २ वर)

### नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी होण्याची दुसरी वेळ

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे रविवारी, उपराजधानीतील राजभवनात शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली. एक हजार पाहुण्यांची आसन व्यवस्था केली जात आहे. राजभवनातील हिरवळीवर शपथविधी होणार आहे. १५ डिसेंबरला दुपारी ४ वाजता नागपूरमध्ये राजभवनावर हा सोहोळा होत आहे. राज्याच्या राजकीय ईतिहासात नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी २२ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ यांच्यासह डॉ. राजेंद्र गोडे, जयदत्त क्षीरसागर, वसुधा देशमुख, भरत बाहेकर यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली होती.

## बीड जिल्हयातून २३९३ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली



बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून आनंद एल, यावलकर साहेब प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून २३९३

(उर्वरीत पान २ वर)



## प्रशांत महाजन सक्तीच्या रजेवर

केज/प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी जिल्हा बंद पुकारण्यात आला होता. यामध्ये सर्व आरोपींसह पोलीस प्रशासनातील दोषी अधिकाऱ्याविरोधात कारवाई करण्याची मागणी

(उर्वरीत पान २ वर)

## परभणीतील कोंबींग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या



### आ.संदीप क्षीरसागरांची पोलीस महासंचालकांकडे मागणी

बीड ।प्रतिनिधी

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याचा प्रकार घडला होता. याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजबांधवांनी परभणीमध्ये आंदोलन केले होते. त्यामुळे अनेक समाजबांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि होत आहेत. तसेच कोंबींग ऑपरेशन करून नागरिकांना मारहाण केली जात आहे. दरम्यान भारतीय राज्यघटना म्हणजे आपल्या

(उर्वरीत पान २ वर)

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल

अ‍ॅडव्हान्स अ‍ॅनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर

डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन

आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच

महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.

मुळव्याध करीता विशेष उपचार

- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पिटलचा पत्ता

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँण्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009

## कॅफेमध्ये अश्लील कृत्याला परवानगी देणाऱ्या कॅफे मालकाला अटक

### बीड शहर पोलिसांची दबंग कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

दिनांक ११/१२/२०२४ रोजी कॅफे फोरचे मालक विवेक सुधाकर जाधव यांनी एका अल्पवयीन मुलीला एका मुलासोबत एकांतवासात अश्लील कृत्य करण्यास बसू दिले. या प्रकरणाची खातरजमा करण्यात आली आणि व्हिडिओ शूटिंग पण करण्यात आली. यामुळे रितसर तक्रार नोंदवून यातील तो मुलगा आणि कॅफे मालक विवेक सुधाकर जाधव, राहणार संत नामदेव

(उर्वरीत पान २ वर)



## शिवसेना जिल्हाप्रमुख मुळूक, गलधर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

### स्व.संतोष देशमुख कुटुंबीयांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत - मुळूक, गलधर

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्दयीपणे हत्या केल्याची दुर्दैवी घटना चार दिवसांपूर्वी घडली. या घटनेचे बीड जिल्ह्यातच नाही तर राज्यभर पडसाद उमटले. जिल्ह्यातील जनतेने या घटनेचा तीव्र निषेध केला. दरम्यान शनिवारी (दि.१४) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. देशमुख कुटुंबियांच्या लढाईत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगून जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी दुपारी अपहरण करुन हत्या करण्यात आली. घटनेनंतर देशमुख यांच्या हत्येचे जिल्हयात तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी नऊ तास रास्तारोको करण्यात आला. मानवी संवेदना हेलावून टाकणाऱ्या या घटनेचा विविध स्तरातून तीव्र निषेध करण्यात आला. दरम्यान शनिवारी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसैनिकांनी

मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेऊन देशमुख कुटुंबिया सोबत शिवसेना कायम सोबत असल्याचे सांगितले.

(उर्वरीत पान २ वर)

## पाटोदा लोकन्यायालयात ३५२ प्रकरण निकाली

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा न्यायालयात आज दिनांक १४/ १२ /२०२४.रोजी लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते त्या अनुषंगाने पाटोदा न्यायालयीतील दिवाणी व फौजदारी व इतर बँकेचे प्रकरण असे एकुण ३६२८ प्रकरण लोकन्यायालयात ठेवण्यात आलेले होते त्यापैकी ३५२ प्रकरण हे निकाली काढण्यात आलेले आहे व तसेच २२ लाख ८१ हजार ५२० रुपये रक्कम वसूली करण्यात आली आहे. सदर लोकन्यायालयात मा. न्यायाधीश एस एस पाटील मॅडम व बीड येथील न्यायाधीश बराड साहेब यांनी दोन पॅनल मध्ये काम पाहण्यात आले कामकाज पाहण्यासाठी अड.एम व्ही जाधव व एडवोकेट डी.एन.पारगावकर यांनी काम पाहिले याप्रसंगी सदर लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट एस आर नागरगोजे वकील संघाचे सचिव एडवोकेट सय्यद अशरफ यांनी व इतर विधीज्ञ व न्यायालयीन कर्मचारी यांनी विषेश परिश्रम घेतले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# दक्षिणेतला दिग्विजयी

कोणत्याही खेळाप्रमाणे बुद्धिबळातही जगज्जेतेपद मिळवणे सोपे नाही. आजवर दीडेक डझन खेळाडूंनाच ते जमले. त्यात पुरुषांमध्ये १८व्या वर्षी निर्विवाद जगज्जेतेपद ही तर आणखी दुर्मीळ बाब. भारताच्या दोम्माराजू गुकेशने ही अपूर्वाई साधली आणि मूळ भारतीय म्हणवला जाणाऱ्या या खेळाची पाळेमुळे या भूमीत खऱ्या अर्थाने रुजली असल्याची प्रचीती आणून दिली. विश्वनाथन आनंद हा भारताचा पहिला जगज्जेता. त्याचे साम्राज्य खालसा झाल्यानंतर ११ वर्षांनीच गुकेशने जगज्जेतेपद पटकावले. हे सगळे इतक्या लवकर घडून येऊ शकते, याची खात्री फारच थोड्यांना असावी. या थोडक्यांमध्ये स्वत: गुकेश होता हे महत्त्वाचे. दोम्माराजू गुकेश बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या लढतीत तोपर्यंत जगज्जेता असलेला चीनचा प्रतिस्पर्धी डिंग लिरेनपेक्षा गुणांकनाच्या बाबतीत सरस होता. तरीदेखील अशा लढतींची स्वत:ची अशी वैशिष्ट्ये असतात. या लढतींमध्ये खेळण्याचा अनुभव अनेकदा गुणांकन किंवा इतर निकषांपेक्षा सरस ठरू शकतो. तो डिंग लिरेनकडे होता. डिंग लिरेन गेल्या वर्षी जगज्जेता बनला. कारण त्याच्या आधीच्या वर्षी नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने पारंपरिक प्रकारात जगज्जेतेपदाच्या लढतींमधून 'निवृत्ती' जाहीर केली. त्याच्यासारख्या अपराजित आणि प्रतिभावान खेळाडूच्या माघारीमुळे बुद्धिबळविश्वात पोकळी निर्माण झालीच, तरी चुरसही वाढली. याचा फायदा घेणाऱ्यांमध्ये डिंग सर्वश्रेष्ठ ठरला. हा आणखी काही काळ जगज्जेतेपदावर राहू शकेल असे त्याच्याविषयी बोलले गेले. एरवी चिनी मंडळी ही मानसिकदृष्ट्या कणखर आणि भावनातीत थंड व्यवहारवादी मानली जातात. डिंग लिरेन अपवाद ठरला. उच्च स्तरावरील बुद्धिबळामध्ये सातत्याने चमकत राहण्यासाठी प्रचंड तयारीत राहावे लागते, मानसिक आणि शारीरिक ताणतणाव झेलावा लागतो. 'जगज्जेत्या'कडून त्या प्रमाणात अपेक्षाही वाढलेल्या असतात. त्या अपेक्षांचे, तयारीचे, ताणाचे ओझे लिरेनला पेलवले नाही. जवळपास नऊ महिने तो सर्व प्रकारच्या बुद्धिबळापासून दूर होता. मानसिकदृष्ट्या कोलमडला होता. त्याच्या अवस्थेबद्दल त्याचे प्रतिस्पर्धीही त्याची कीव करू लागले होते. कार्लसनच्या मते, लिरेन जगज्जेतेपदाची लढत खेळूच शकणार नाही इतका कोसळला होता. त्यातून डिंग सावरला, खेळला. इतकेच नव्हे तर गुकेशला तोडीस तोड ठरला. तरीदेखील त्याच्या तुलनेत गुकेशमध्ये अधिक ऊर्जा आणि ईर्षा दिसून आली हे नाकारता येत नाही. अखेरच्या टप्प्यात ही गुणद्वयीच निर्णायक ठरली. त्याची डिंग लिरेनविरुद्धची लढत सध्या चर्चेत आहे. पण जगज्जेतेपद हा गुकेशच्या प्रदीर्घ वाटचालीतला केवळ एक टप्पा आहे. ते शिखरही नव्हे. खुद्द गुकेशला याची पुरेपूर जाणीव आहे. या वाटचालीचा धांडोळा घेणे आवश्यक.

वर्षभर गुकेश उच्च दर्जाचे बुद्धिबळ खेळत आहे. त्याच्यासह तिघा प्रतिभावान भारतीय युवकांची चर्चा जगभर होते. आर. प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगेसी हे इतर दोघे. प्रत्येकाचे स्वतंत्र वैशिष्ट्य. प्रज्ञानंदने इतर दोघांपेक्षा कार्लसनला अधिक वेळा हरवून दाखवले आहे. अर्जुन इतर दोघांच्या आधी २८०० एलो गुणांच्या अत्युच्च पातळीवर जाऊन पोहोचला आहे. भारताचा विश्वनाथन आनंद आणि आणखी १४ बुद्धिबळपटूंनाच हे जमू शकले. या दोघांपेक्षा गुकेश लहान. तरीही गेली चार वर्षे तो जी परिपक्वता आणि तयारी दाखवत आहे, ते पाहिल्यावर 'हाच खरा आनंदचा वारसदार' असे कार्लसनसह अनेकांनी बोलून दाखवले होते. त्याचा जन्म उच्चशिक्षितांपोटी झाला, तरी दोन्ही पालकांना गुकेशसाठी सुरुवातीस खस्ता खाव्या लागल्या. १२व्या वर्षी तो ग्रँडमास्टर बनला. त्यानंतर जवळपास प्रत्येक वर्षी नवनवीन शिखरे तो सर करत आहे. मध्यंतरी कोविडमुळे सदेह बुद्धिबळ स्पर्धा जवळपास थांबल्या आणि ऑनलाइन स्पर्धांचे युग सुरू झाले. अनेक बुद्धिबळपटूंनी या काळात नशीब काढले. काहींनी पारंपरिक प्रकाराला सोडून अशा दूरस्थ बुद्धिबळातच कारकीर्द घडवण्याचा निर्णय घेतला. त्या वाटेने गुकेश फारसा गेला नाही. हे त्याला कोणी सांगितल्याची शक्यता कमी. कारण अल्प वयात गुकेश पोक्तांना लाजवेल इतका एकल निश्चयी आणि एकाग्र बनला. आपले लक्ष्य केवळ बुद्धिबळ जगज्जेतेपदच, हे तो खूप आधीपासून सांगू लागला. काहींना त्याच्या वक्तव्यात युवासुलभ उत्साह दिसला, तर काहींना त्या वयास साजेसे भानरहित अज्ञान. पुढे कोविडोत्तर सारे काही मार्गी लागल्यावर स्पर्धा होऊ लागल्या. त्या वेळी कार्लसनसकट अनेक आघाडीच्या बुद्धिबळपटूंना गुकेश त्याच्या वयापेक्षा किती तरी अधिक परिपक्व आणि स्थिरचित्त भासला.

# साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी

## डॉ. शिरीष खेडगीकर यांची अपेक्षा
## अंबाजोगाईत ११ व्या साहित्य संमेलनाचे शानदार उदघाटन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा डॉ. शिरीष खेडगीकर यांनी अंबाजोगाई येथे आयोजित ११ व्या साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केली.या प्रसंगी संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार, सुदर्शन रापतवार स्वागताध्यक्ष यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.या प्रसंगी रचना यांना डॉ शैला लोहिया लेखिका पुरस्कार, उमेश मोहिते यांना मंदाताई देशमुख कथा लेखन पुरस्कार तर अलीम अजीम यांना प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना डॉ. शिरीष खेडगीकर म्हणाले की, लोकाश्रयातून साहित्य सम्मेलन म्हणजे आशादायक गोष्ट आहे. हे सम्मेलन इव्हेंट नव्हे तर मूहमेन्ट व्हावे. अखिल भारतीय साहित्य सम्मेलन झाले त्यावेळी मला सहहागी होता आले आणि त्यामुळे माझी साहित्याकडे ओढी झाली. अनेक लेखक योगेश्वरी शाळे मधुन उदयास आले. हे साहित्य सम्मेलन बहु सांस्कृतिक बनलं आहे. या साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली. या वेळी बोलताना संमेलन अध्यक्ष बालाजी सुतार म्हणाले की, अंबाजोगाई साहित्य संमेलनापासून, मराठवाडा साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपर्यंतचे सोहळे मी 'निमंत्रित' म्हणून मंचावरून अनुभवलेले आहेत. या सगळ्यात, मला छोट्या संमेलनांबद्दल नेहमीच प्रेम वाटत आलेलं आहे. 'संमेलन' ही गोष्ट व्याख्येत बसवता येणं जरासं कठीण आहे. सुगीच्या हंगामात भरघोस पीक यावं त्याप्रमाणे दिवाळीपासून पुढे पाडव्यापर्यंत वेगवेगळ्या संमेलनांची रेलचेल महाराष्ट्रात असते. काही शहरांत लिट-फेस्टही होतात. 'दर्जा' मात्र मोजक्याच ठिकाणी राखला जाताना दिसतो, साहित्य संमेलनांच्या माध्यमातून अशा प्रकारचा जागर अपेक्षित असतो. किमान तो जागर घडून येण्याच्या दिशेने काही हालचाली अशा संमेलनांच्या माध्यमातून निश्चितपणे घडून येतात, असं मला वाटतं.

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात शिक्षणासाठी आलो, तेव्हापासून या गावाबद्दल मनात जे प्रेम निर्माण झालं, ते आज तीन दशकांनंतरही किंचितसुद्धा कमी झालेले नाही. याचं मुख्य कारण हे, की, हे गाव मुळातच तितका जीव जडण्या लायक, तितका आदर करण्यालायक आहे. कला-साहित्यात रमणारी रसिक आणि समाजकारणात नीतिमत्ता जोपासणारी माणसं मला मिळाली. काही भली, काही वाईटही. अशा सगळ्या माणसांनी गावाला 'गावपण' दिलेलं असतं. अंबाजोगाईपुरता विचार केला, तर इथे अशी विराट उंचीची माणसं होऊन गेली, आजही आहेत, ही गोष्ट या गावाबद्दल प्रेम निर्माण करायला पुरेशी आहे. आद्यकवी मुकुंदराजांपासून, 'पासोडी'कार दासोपंतांपासून, प्रखर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थांपासून, विराट ताकदीचे कादंबरीकार प्रा. रंगनाथ तिवारी आणि सुस्मृत रामकाका मुकद्दम, एकनाथराव गुरुजी, प्रा. शैला लोहिया; उर्दूतले कवी वफा साहेब यांच्या सह बहुसंख्य विविध क्षेत्रा मधील व्यक्तिमत्व

या संदर्भात मुद्दाम उल्लेख करावाच लागेल असा इथला यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह! सुजन राजकारणी असलेल्या सुस्मृत भगवानराव लोमटे यांच्या पुढाकारातून चालू झालेल्या आणि मागच्या तीन दशकांपासून दगडू लोमटे यांनी महाराष्ट्रभर एकहाती नावारूपाला आणलेल्या या समारोहाने या सबंध शहरावर, इथल्या पुढच्या-पुढच्या पिढ्यांवर कला-साहित्य-संगीताचे अक्षरश: संस्कार केलेले आहेत.

इतिहासाला अर्थ देण्याचं आणि उन्हातल्या वर्तमानाच्या माथ्यावर छत उभं करण्याचं काम नेहमी लेखणीनेच केलेलं आहे. लेखणीला दुसरा पर्याय असू शकत नाही. ज्ञानेश्वरांना आठवा, किंवा तुकारामांना डोळ्यांसमोर येऊ द्या; म्हणजे लेखणीचं मोल लक्षात येऊ शकेल. दैनंदिन आयुष्यात आपल्या रोजच्या भोवतालातली, आपल्या निकटची माणसं रोजच्या रोज भरडली जात असतात त्याचं कोणाला सोयरसुतक दिसत नाही. बोलण्यासाठी घरात कुणीही उपलब्ध नसल्याने पैसे मोजून नाती विकत घ्यावी लागतात हे महाराष्ट्राच्या तथाकथित सांस्कृतिक राजधानीतलंच नव्हे तर गावोगाव सगळीकडेच दिसू लागलेलं वास्तव आहे.

पुरस्कार प्राप्त रचना सत्काराला उत्तर देताना म्हणाल्या की, मला अमर हबीब व दगडू लोमटे यांचा अभिमान आहे. डॉ शैला लोहिया यांचं नांव फार मोठे आहे मला हा पुरस्कार मिळाला हे माझं भाग्य आहे. माझ्या माहेरच्या लोकांनी घेतलेली ही दखल सदैव आठवणीत राहील. लिखानाची सुरवात २०१३ साली केली. मानवलोक मधील महिलांच्या मुलाखती घेऊन जो लेख लिहला तो माझा पहिला लेख ज्या नावाने पुरस्कार मिळतोय त्या नावाची उंची वाढवण्याची शक्ती मला मिळावी हीच अपेक्षा.

या वेळी प्रास्ताविक करते वेळी स्वागत अध्यक्ष सुदर्शन रापतवार म्हणाले की, १९९८ पासून अंबाजोगाई मध्ये साहित्य सम्मेलन सुरू झाले. लोकाश्रया वर चालणारे हे साहित्य सम्मेलन सुरू असून याच्या यशस्विते साठी सभासद शुल्क व्यतिरिक्त कोणाकडून ही पैसे जमा केले जात नाहीत. सम्मेलन यशस्वी ते साठी विविध स्पर्धा, कार्यशाळा आयोजित केल्या. साहित्य सम्मेलना मध्ये आगळ्या वेगळ्या विषयावर परिसंवाद होणार आहे.

या प्रसंगी आयोजित जागर दिंडीचे उद्घाटन डॉ. बी. आय. खडकभावी पूर्व स्वागताध्यक्ष यांच्या हस्ते झाले. ही जागर दिंडी छ. शिवाजी महाराज चौक येथून निघून आद्यकवी मुकुंदराज सभागृहात आली यात सहभागी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित जेष्ठ नागरिकांचा पुष्प देऊन सन्मान केला या जागर दिंडीसाठी सुनील व्यवहारे, ॲड. अनंत जगतकर, लक्ष्मण गोरे, कैलास चोले, नामदेव मुंडे, विष्णु सरवदे यांनी पुढाकार घेतला.

या प्रसंगी ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे मार्गदर्शक प्राचार्य कमलाकर कांबळे, जेष्ठ पत्रकार अमर हबीब, तिलोत्तमा पतकराव यांच्या सह उपाध्यक्ष सुभाष बाहेती, वंदना तेलंग, सचिव प्रा. पंडीत कराड, सहसचिवः विष्णू सरवदे, कोषाध्यक्ष गोरख शेंद्रे, व्यासपीठ नियोजन प्रमुख विजय रापतवार, सांस्कृतिक कार्य प्रमुखः सुनील व्यवहारे, प्रसिद्धी प्रमुखः आशरब पठाण, सदस्य दत्ता अंबेकर, चंद्रकला देशमुख, सुजाता भोजने, ॲड. जयंत भारजकर, विशाल जगताप यांच्या सह मसापचे दगडू लोमटे (अध्यक्ष), डॉ. राहुल धाकडे (उपाध्यक्ष), गोरख शेंद्रे (सचिव), प्रा.डॉ. शैलजा बरुरे (कोषाध्यक्ष), प्रा. विष्णु कावळे (सहसचिव), अमृत महाजन, प्रा.डॉ. देविदास खोडेवाड, रेखा देशमुख, निशा चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती

कार्यक्रमाची सुरवात दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक दगडू लोमटे (अध्यक्ष, मसाप) यांनी

# शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत सकारात्मकता दाखवून गेल्या दहा वर्षातील रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करावीत

## नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांची विकास आढावा बैठकीत सूचना

आष्टी (प्रतिनिधी)

सन २०१४ पासून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताची अनेक कामे रखडली असून या कामांना प्राधान्याने गती देऊन ही कामे पूर्ण करावीत. यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कामात सकारात्मकता दाखवावी. विकास कामे करताना कोणताही भेदभाव न ठेवता कठोर भूमिका ठेवून काम करा. तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्यास मी तुमच्या पाठीमागे खंबीर उभा आहे. मात्र तुम्ही देखील आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सतर्क रहावे अशा सूचना नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांच्या विकास आढावा बैठकीमध्ये दिल्या.

या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी नसीमा शेख यांच्यासह आष्टी, पाटोदा आणि शिरूर का. येथील तहसीलदार, गटविकास अधिकारी, दुय्यम निबंधक, पोलीस निरीक्षक, गटशिक्षण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे या विभागांचे उप अभियंता आणि इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये वरदान ठरणारा प्रकल्प आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये आवश्यक त्या गतीने कामे झाली नाहीत, ती आता तातडीने पूर्ण करावयाची आहेत. पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील असलेले सिंदफणा मध्यम प्रकल्प, उखळवाडी कारेगाव, पांगरी, जाधववाडी या तलावांची उंची वाढवण्याचे काम २०१४ पासून रखडलेले आहे. ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले संयुक्त मोजणी आणि इतर कामे संबंधिताने तातडीने करावीत.

पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे असंतोष आहे. या कामी तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शिरूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठा घोटाळा असून त्याची चौकशी करून या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आष्टी तालुक्यातील ठोंबळ सांगवी आणि गहूखेल येथील प्रकल्पाचेही काम २०१४ पासून रखडलेले आहे या प्रकल्पांचे संयुक्त मोजणी अहवालाचे गावामध्ये जाहीर वाचन करण्यात यावे. गोरगरीब शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे लवकर मिळतील याकडे लक्ष द्यावे. आष्टी तालुक्यातील ४६ किलोमीटर अंतराच्या गावांमधून जाणारा सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्गावरील १९ गावांमधील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाबाबत तक्रारी प्राप्त आहेत, त्याची देखील शहानिशा करून या रस्ता कामाच्या संयुक्त मोजणी अहवालाची चौकशी करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली. शासनाच्या विकास कामांमध्ये स्वार्थासाठी आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करावेत असे सांगितले. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता ठेवावी, खाते प्रमुखांनी याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये सिजेरियन मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्यामुळे गोरगरीब सर्वसामान्य रुग्णांना त्याचा लाभ मिळाला होता परंतु अलीकडच्या काळामध्ये हे प्रमाण कमी झाल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत असलेल्या जलजीवन योजनेअंतर्गत सर्वात जास्त योजना आष्टी मतदार संघात असून अधिकाऱ्यांनी या सर्व योजना दर्जेदार करून नळाद्वारे नागरिकांना पाणी मिळावे, ज्या कामांमध्ये हलगर्जीपणा झाला आहे ते काम पूर्ण करून घ्यावे. निधीची काळजी करू नका मी निधीची व्यवस्था करतो, तुम्ही मात्र कामे चांगल्या पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना दिल्या. आष्टी येथील खाजगी कोचिंग क्लासेस आणि कन्या शाळा परिसरातील रोड रोमि यांचा बंदोबस्त करण्यात यावा. यासाठी दामिनी पथक तयार करून प्रभावी पद्धतीने या रोड रोमिओ वर कारवाई करावी असे सांगून आपल्या हद्दीतील हातभट्टी, ताडी, अमली पदार्थ विक्री होऊ नये यासाठी कठोर कारवाई करण्याचे सांगितले. सध्या शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुरेसा दाबाने वीज उपलब्ध होत नसल्याने वीज वितरण विभागाने तातडीने सर्वेक्षण करून किती ट्रान्सफॉर्मर्स लागतील याची माहिती द्यावी. शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने आणि नियमित वीज उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

पान १ वरून...

**आज मंत्र्यांचा...**

शपथविधीसाठी हजर राहण्याचा निरोप देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. झिरवाळ यांना कोणते मंत्रिपद मिळणार, हे पहावे लागणार आहे.

राष्ट्रवादीत जुन्या ५ मंत्र्यांची नावे चर्चेत

देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपद मिळून १० मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये छगन भुजबळ, धनंजय मुंडे, धर्मरावबाबा आत्राम, अदिती तटकरे, अनिल पाटील या विद्यमान मंत्र्यांची नावे कायम राहतील. दिलीप वळसे पाटील यांनी आधीच नकार कळवला आहे, तर हसन मुश्रीफ यांचा पत्ता कट केला जाऊ शकतो. दत्ता भरणे यांची वर्णी लागण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली.

**शिवसेना जिल्हाप्रमुख ..**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या खून प्रकरणाचा तपास सीआयीडी मार्फत करावा  अशी मागणी केली होती त्यानुसार या प्रकरणाचा तपास सीआयडी कडे देण्यात आला आहे  स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात लक्ष घातल्याचे मुळुक यांनी यावेळी सांगितले.

यावेळी केज युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, शहर प्रमुख बाळासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, विकास काशीद केज तालुका सचिव, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, विभाग प्रमुख आकाश बहीर, शिवाजी गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख अजित गोरे, सरपंच बनसारोळा मनोहर गोरे सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

**कॅफेमध्ये अश्लील ..**

नगर, बीड यास अटक करण्यात आली. त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायदा याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच फिर्याद मध्ये असा पण उल्लेख आहे की इतरही कॅफेवर अशा प्रकारचे अश्लील कृत्याला परवानगी देण्यात येत असते. यामुळे शहरातील सर्व कॅफे आता या गुन्ह्याच्या तपासात अंतर्भूत झाली असून ज्या कॅफेमध्ये अशा प्रकारचे आक्षेपार्य जोडपे सापडतील त्यांच्यावर  बाल लैंगिक अत्याचार कायद्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येणार आहे.सदरील कारवाई अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबाजी राठोड, पोलीस अंमलदार गोरे, सुशेन पवार,  मनोज परजणे

पान १ वरून...

सय्यद आशपाक यांनी केली आहे.

**परभणीतील कोंबींग ...**

अस्मितेचा विषय असल्याने त्याबाबत कसलीही अवहेलना समाज खपवून घेऊ शकत नाही. या भावनेतून हे आंदोलन करण्यात आले होते. तरी पोलिस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन थांबवून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटनाकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आहे व पुतळ्याच्या जवळच भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारलेली आहे. मंगळवारी (दि.१०) रोजी या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली. शेवटी भारतीय संविधान हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी समाजबांधवांनी आंदोलने केली. आंदोलनाला अल्प प्रमाणात हिंसक वळण आले. त्यामुळे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन करून आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे सुरू आहे. परंतु या आंदोलनाचा हेतू हा मुळीच हिंसा पसरवणे नव्हता. समाजबांधवांनी लोकशाही मार्गानेच आंदोलन केले होते. परंतु अशा आंदोलनाच्या आडून काही प्रवृत्ती हिंसा पसरविण्याचे काम करत असतात हे बर्याचवेळा लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेत, कोंबिंग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे.

**प्रशांत महाजन..**

केली आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वादग्रस्त ठरलेले पोलीस निरीक्षक

पान १ वरून...

प्रशांत महाजन हे सक्तीच्या रजेवर गेले आहेत.त्यांचा अतिरिक्त कारभार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधककक्षाचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्याकडे देण्यात आला आहे.पोलीस उप निरीक्षक राजेश पाटील यांच्या निलंबनानंतर पोलीस प्रशासनातील ही दुसरी कारवाई आहे.

**बीड जिल्हयातून....**

प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११०४२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन. आय. ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ४३४ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ४८९३७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १९५९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण २३९३ प्रकरणे निकाली निघाली आहेत.यामध्ये १२ कोटी ९८ लाख ३८ हजार २५९ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी मा. श्रीमती एस.आर. पाटील जिल्हा न्यायाधीश-१ बीड, मा. श्री. जी. जी. सोनी साहेब, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, मा.श्री. व्ही. एच. पाठवदकर साहेब, जिल्हा न्यायाधीश२, मा. श्रीमती एस.आर. शिंदे मॅडम, जिल्हा न्यायाधीश ३ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष मा.श्री. आर.डी. येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, बैंक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



# लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात मोठ्या उत्साहात श्रीदत्त जयंती साजरी

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात विश्वस्तांनी आज दि.१४ शनिवार रोजी दत्त जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंतीला धार्मिक मान्यतेनुसार श्रीदत्तात्रेयसह लक्ष्मी नारायणाची पुजा करण्यात आली. यावेळी चौरंगावर पांढरे वस्त्र टाकुन त्यावर दत्तात्रेय महाराजांची मुर्तीची स्थापना करण्यात येऊन पंचामृताने दत्तात्रेयाचा अभिषेक करण्यात आला.धुप, दिवा, फुलं, नैवेद्य अर्पण करत आरती करण्यात आली.हिंदु धर्मात मार्गशीर्ष महिन्याला विशेष महत्त्व आहे.मार्गशीष महिन्यातील शुक्ल पक्षातील पोर्णिमेला दत्ताचा जन्म झाला म्हणून हा दिवस दत्त जयंती म्हणून साजरा केला जातो. दुपारी १२ ते १ दरम्यान महाआरती, भजन, किर्तन व दुपारी १ ते ५ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने  उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बाळुकाका पाटोदकर, बंडु पाटोदकर,राजेभाऊ गिरे,

# श्री दत्त जयंती निमित्त हरे राम नगर येथे ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांचे हरी किर्तन संपन्न

## आई-वडिलांपासून वारकरी संप्रदायाचा लळा, मात्र राजकीय क्षेत्रात आल्यामुळे वेळ देता येत नाही - माजीमंत्री आ. बबनराव लोणीकर

अंबड ।प्रतिनिधी

माझा जन्मच मुळात वारकरी संप्रदायातील कुटुंबात झाल्यामुळे माझ्यावर वारकरी संप्रदायाचे संस्कार असून नित्य नियमाने पंढरीची वारी करणारी माझे वडील, यांच्यामुळे मी सांप्रदायाशी जोडल्या गेलो, आपल्याला ३२ अभंग पाठ असून, आपण वेळ मिळेल तेव्हा नित्य नियमाने भजन पूजन करण्यासाठी घरच्या घरी का होईना वेळ देत असतो असे मत राज्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले.




ते हरिराम नगर दैठणा ता परतूर येथे कणसे परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येत असलेल्या दत्त जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजित ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे यांच्या हरी किर्तन बोलत होते.

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मी, सेवेचा वसा हाती घेऊन दलित पीडित, निराश्रीतांची सेवा करत गेलो, मुळातच धर्म संस्कृतीला जोपासणारी संस्कार माझ्यात असल्यामुळे माणसांना जोडत गेलो त्यातून समाजाला न्याय देऊ शकलो विकासाची अनेक कामे मतदार संघात करू शकलो असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.शत्रुघ्न कणसे व त्यांच्या परिवाराने त्यांच्या पाच पिढ्यापासून दत्त जयंतीची ही परंपरा सतत जोपासलेली असून कणसे परिवाराचे आपण अभिनंदन करत असून यापुढेही या परिवाराने धर्म संस्कृतीसाठी अशाच प्रकारचे उत्सव नियमितपणे आयोजित करावे असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी ह भ प श्रीकृष्ण महाराज शिंदे शहापूरकर यांनी हरी कीर्तनाच्या माध्यमातून, सेवा धर्म, प्रपंच आदी बाबींचा उहापोहो करत प्रपंच करत असताना देव देश आणि धर्मासाठी काम करण्याची आवाहन यावेळी उपस्थित त्यांना केले त्याचबरोबर जो राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्ही चा मेळ घालतो तो जीवनामध्ये यशस्वी होतो कारण राजशत्तेचा आश्रेय खूप गरजेचा असतो आणि आपण पाहतो की या भारत देशामध्ये कधी नव्हे ते रामराज्य अयोध्येतील श्री प्रभूराम यांचे मंदिर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्यातून स्थापन झाले नारीशक्तीचा आवर्जून उल्लेख करताना महाराजांनी स्थैर्य लक्ष्मी ही केवळ नारीशक्तीमुळेच टिकून राहते असे सांगतानाच महिलांनी सासू सासरे कुटुंब यांची सेवा करावी असे यावेळी बोलताना सांगितले श्री लोणीकर हे येणाऱ्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात उच्च पदावर राहतील असेही संकेत महाराजांनी बोलताना व्यक्त केले.या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षातील सामाजिक क्षेत्रातील धार्मिक क्षेत्रातील वैद्यकीय क्षेत्रातील व्यापारी क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित मंडळींची उपस्थिती होती.

# 'ॲग्रीस्टॅक' योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार 'फार्मर आयडी'

लातूर ।प्रतिनिधी

राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या २४ ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णय निर्णयानुसार लातूर जिल्ह्यात सोमवार, १६ डिसेंबर २०२४ पासून ग्रीस्टॅक योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक गावात कॅम्प आयोजित केले जाणार असून या कॅम्पमध्ये गावातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक्र तयार करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.'ग्रीस्टॅक'मध्ये शेतकऱ्यांसाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतीचा आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच असा माहिती संचांचा यामध्ये समावेश आहे.



# पैठण पंचायत समिती अंतर्गत विविध विकास कामाचा आढावा बैठक संपन्न

पैठण ।प्रतिनिधी

पंचायत समिती पैठण अंतर्गत ११० ग्रामपंचायत चा विविध विकास कामाचा आढावा जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी पंचायत समिती पैठण सभागृहात घेतला. या वेळी विकास मीना यांनी सर्व ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी यांना सूचना केल्या की, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या लोकाभिमुख योजना पात्र लाभार्थीपर्यंत वेळेमध्ये पोहोचवा. गाव पातळीवरील सामूहिक व वैयक्तिक लाभाच्या योजना तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. जे अधिकारी कर्मचारी या कामी कुचराई करतील अशावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल असा इशारा देखील दिला.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद संभाजीनगर तथा प्रशासन विकास मीना यांनी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांची बैठक घेऊन शासनाच्या विविध योजनाचा गाव निहाय आढावा घेतला यामध्ये पंचायत करवसुली, घरकुल योजना, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मॉडेल व्हिलेज, घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन, जल जीवन मिशन , रोजगार हमी योजना, लखपती दीदी, पशुसंवर्धन योजना, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, एकात्मिक बालविकास योजनाचा आढावा घेऊन, डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीला पैठण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल मुंगीकर, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेश कांबळे, विस्तार अधिकारी (पंचायत) दशरथ खराद, राधाकिशन चौधरी, सुनील इंगळे, देविदास गवळी, उप अभियंता बांधकाम संभाजी अस्वले, कार्यालय अधीक्षक सर्व विभाग प्रमुख,अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या सूत्रसंचालन विस्तार अधिकारी दशरथ खराद यांनी केल

# राष्ट्र निर्माण मध्ये भाऊ साहेबांचे विचार प्रासंगिक - डॉ राजेश मिरगे

अंबड ।प्रतिनिधी

मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती कला व वाणिज्य महाविद्यालय शिरूर जिल्हा अमरावती तसेच मॉडेल कॉलेज घनसावंगी जिल्हा जालना यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊसाहेबांचे राष्ट्र निर्माण आणि आपली भूमिका या विषयावर देशाचे प्रथम कृषिमंत्री डॉ पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ रामराव चव्हाण हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ राजेश मिरगे हे होते यावेळी त्यांनी हरित क्रांतीचे प्रणेते कृषी शिक्षण व सामाजिक समरसतेचे अग्रदूत म्हणून आंतरराष्ट्रीय विद्वान संविधान सभेसाठी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत ज्यांनी काळ व्यतीत केला व प्रगतिशील विचारांचे धनी स्वर्गीय डॉ पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांच्या विचारांची वर्तमान समाजामध्ये प्रासंगिकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. डॉ पंजाबराव देशमुख यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आदर्श समाजास घालून दिला तसेच कृषी क्षेत्रात सामाजिक एकता व प्रगतिशील विचारांमध्ये त्यांचे मोलाचे स्थान आहे. असे ते म्हणाले राष्ट्र निर्माण मध्ये त्यांची भूमिका मौलिक होती असे ते म्हणाले. अध्यक्ष समारोपात प्राचार्य डॉ रामराव चव्हाण यांनीही डॉ पंजाबराव देशमुख यांच्या जीवन कार्यावरती प्रकाश टाकला. यावेळी मंचावर डॉ व्ही एस भटकर, डॉ राम कुलसंगे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या शुभहस्ते प्राचार्य डॉ रामराव चव्हाण यांना डॉ पंजाबराव देशमुख यांची प्रतिमा भेट देण्यात आली. डॉ अजय कुकडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले सूत्रसंचालन डॉ बाळासाहेब सोनवणे यांनी तर आभार डॉ ऋषी बाबा शिंदे यांनी मानले यावेळी सांस्कृतिक विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय युवक महोत्सवात पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व साहसी शिबिर सहभागाबद्दल मंगेश मस्के या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी डॉ कन्नूलाल विटोरे, डॉ भीमराव पुंदगे,डॉ ज्ञानेश्वर खोजे,प्रा उदय पवार,डॉ संभाजी मराठे,सह शिक्षक शिक्षक इतर कर्मचारी उपस्थित होते.

# नवस पुर्तीसाठी गेलेल्या महेश शिंदे यांना भेटण्यासाठी आ. विजयसिंह पंडित थेट अक्कलकोट येथे दाखल

गेवराई ।प्रतिनिधी

विजयसिंह पंडित हे आमदार व्हावेत म्हणून महेश शिंदे यांनी श्री स्वामी समर्थ महाराज यांना त्यांच्या दर्शनासाठी अक्कलकोटला पायी चालत येण्याचा नवस केला होता. तोच नवस पूर्ण करण्यासाठी महेश शिंदे हे त्यांचे गाव परभणी केसापुरी येथून दिनांक ७ डिसेंबर रोजी पायी अक्कलकोट येथे रवाना झाले. ते दिनांक १३ डिसेंबर रोजी अक्कलकोट येथे पोहोचले. केसापुरी परभणी ते अक्कलकोट हे जवळपास २३५ किलोमीटरचे अंतर त्यांनी अवघ्या सात दिवसात पूर्ण केले. त्यांच्या या पदयात्रेत त्यांचा मित्रपरिवार देखील सहभागी होता.



महेश शिंदे हे आपण आमदार म्हणून निवडून यावे म्हणून अक्कलकोटला गेले आहेत याची माहिती मिळताच आ. विजयसिंह पंडित हे देखील आपल्या कार्यकर्त्याला भेटण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर रोजी अक्कलकोट येथे दाखल झाले.त्यांनी महेश शिंदे यांनी नवस पुर्ती केल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार केला.त्यांच्या या भेटीदरम्यान गोपाळ धांडे सर, बळीराम चव्हाण, धनंजय वरकड, इंजि. संग्राम कवचट व मित्रपरिवार उपस्थित होता.

# लिंबागणेश जि.प.गटात विकासकामाचे उद्घाटन

## बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजीबुवा रस्त्याचा शुभारंभ

बीड ।प्रतिनिधी

**लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागातील गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजी बुवा मंदीरापर्यंतच्या एकूण साडेसहा किलोमीटर डांबरी, एकूण साडेतीन कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ.क्षीरसागर पहिल्यांदा या भागात आल्यामुळे नागरिकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले.**



लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागात असणाऱ्या गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे. येथील लोकांना सोयीसुविधेच्या उपलब्धतेसाठी वाहतूक व्यवस्था सक्षम असावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून ईजिमा ११५ ते नागझरी फाटा ते नामाजीबुवा मंदीरापर्यंत ०/०० ते ६/३०० च्या एकूण साडेसहा किलोमीटर अंतर असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुरी मिळाली. शनिवार (दि.१४) रोजी या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांनी केला. या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरूवात करण्यात येणार आहे. या विकासकाम शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, वैजनाथ नाना तांदळे, गोरख शिंगण, बाळासाहेब गोरे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांची विकास आढावा बैठकीत सूचना

# शासकीय अधिकाऱ्यांनी कामाबाबत सकारात्मकता दाखवून गेल्या दहा वर्षातील रेंगाळलेली कामे तातडीने पूर्ण करावीत

आष्टी ।प्रतिनिधी

सन २०१४ पासून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताची अनेक कामे रखडली असून या कामांना प्राधान्याने गती देऊन ही कामे पूर्ण करावीत..यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी कामात सकारात्मकता दाखवावी विकास कामे करताना कोणताही भेदभाव न ठेवता कठोर भूमिका ठेवून काम करा तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्यास मी तुमच्या पाठीमागे खंबीर उभा आहे मात्र तुम्ही देखील आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सतर्क रहावे अशा सूचना नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांच्या विकास आढावा बैठकीमध्ये दिल्या

या बैठकीसाठी उपविभागीय अधिकारी नसीमा शेख यांच्यासह आष्टी, पाटोदा,आणि शिरूर का.येथील तहसीलदार, गटविकास अधिकारी, दुय्यम निबंधक, पोलीस निरीक्षक, गटशिक्षण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पाटबंधारे, बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे, या विभागांचे उप अभियंता आणि इतर सर्व खाते प्रमुख उपस्थित होते पुढे बोलताना..आ.सुरेश धस म्हणाले की,

आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये वरदान ठरणारा प्रकल्प आहे गेल्या दहा वर्षांमध्ये आवश्यक त्या गतीने कामे झाली नाहीत ती आता तातडीने पूर्ण करावयाची आहेत पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील असलेले सिंदफणा मध्यम प्रकल्प, उखळवाडी कारेगाव पांगरी जाधववाडी या तलावांची उंची वाढवण्याचे काम २०१४ पासून रखडलेले आहे ही कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले संयुक्त मोजणी आणि इतर कामे संबंधिताने




तातडीने करावीत..

पैठण पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे असंतोष आहे या कामी तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे सांगून शिरूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये मोठा घोटाळा असून त्याची चौकशी करून या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करणार असल्याचे त्यांनी सांगितले आष्टी तालुक्यातील ठोंबळ सांगवी आणि गहूखेल येथील प्रकल्पाचेही काम २० १४ पासून रखडलेले आहे या प्रकल्पांचे संयुक्त मोजणी अहवालाचे गावामध्ये जाहीर वाचन करण्यात यावे

गोरगरीब शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे लवकर मिळतील याकडे लक्ष द्यावे आष्टी तालुक्यातील ४६ किलोमीटर अंतराच्या गावांमधून जाणारा सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्गावरील १९ गावांमधील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाबाबत तक्रारी प्राप्त आहेत त्याची देखील शहानिशा करून या रस्ता कामाच्या संयुक्त मोजणी अहवालाची चौकशी करण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली शासनाच्या विकास कामांमध्ये स्वार्थासाठी आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करून वेळप्रसंगी गुन्हे दाखल करावेत असे सांगितले..

सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्वच्छता ठेवावी खाते प्रमुखांनी याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये सिजेरियन मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्यामुळे गोरगरीब सर्वसामान्य रुग्णांना त्याचा लाभ मिळाला होता परंतु अलीकडच्या काळामध्ये हे प्रमाण कमी झाल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत असलेल्या जलजीवन योजनेअंतर्गत सर्वात जास्त योजना आष्टी मतदार संघात असून अधिकाऱ्यांनी या सर्व योजना दर्जेदार करून नळाद्वारे नागरिकांना पाणी मिळावे ज्या कामांमध्ये हलगर्जीपणा झाला आहे ते काम पूर्ण करून घ्यावे निधीची काळजी करू नका मी निधीची व्यवस्था करतो तुम्ही मात्र कामे चांगल्या पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना दिल्या आष्टी येथील खाजगी कोचिंग क्लासेस आणि कन्या शाळा परिसरातील रोड रोमि यांचा बंदोबस्त करण्यात यावा यासाठी दामिनी पथक तयार करून प्रभावी पद्धतीने या रोड रोमिओ वर कारवाई करावी असे सांगून आपल्या हद्दीतील हातभट्टी ताडी अमली पदार्थ विक्री होऊ नये यासाठी कठोर कारवाई करण्याचे सांगितले सध्या शेतकऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुरेसा दाबाने वीज उपलब्ध होत नसल्याने वीज वितरण विभागाने तातडीने सर्वेक्षण करून किती ट्रान्सफॉर्मर्स लागतील याची माहिती द्यावी शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने आणि नियमित वीज उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले

# आदर्श शिक्षिका करुणा गायकवाड (धिवार) यांना भुसावळ येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र हिरकणी कर्तबगार महिला राष्ट्रीय पुरस्कार-२०२४ प्रदान

अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा आदर्श शिक्षिका करुणा गायकवाड (धिवार) यांना भुसावळ येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र हिरकणी कर्तबगारमहिला राष्ट्रीय पुरस्कार -२०२४ मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.भुसावळ येथील अनुश्री महिला बहुउद्देशीय सामाजिक तथा शैक्षणिक संस्था भुसावळ यांच्या वतीने भारतीय संविधाना च्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातउल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांच्याकार्य,कर्तृत्वास गती मिळावी प्रेरणा मिळावी त्यामधून समाजा मध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे यामधून नवीन परिवर्तन समाजाची निर्मिती व्हावी या हेतूने दरवर्षी राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न,हिरकणी गुणगौरव पुरस्कार प्रदान केले जातात.दिनांक ०८ डिसेंबर रोजी भुसावळ शहरातील कृष्णाचंद्र सभागृह रेल्वे स्टेशन जवळ सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत राज्यस्तरीय पुरस्कार- २०२४ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर सोहळ्यात करुणा गायकवाड (धिवार)यांच्या गेल्या अनेक वर्षाच्या सामाजिक,शैक्षणिक, साहित्यिक,लोककला, महिला सक्षमीकरण, दारूबंदी,ग्रामस्वच्छता, उद्योग विकास,अंधश्रद्धा निर्मूलन,सामाजिकसमता प्रचार व प्रसार,धम्मकार्यातीलउल्लेखनीय योगदाना बद्दल तसेच राष्ट्रीय विकासात्मक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन भुसावळ येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून प्रवक्ता तथा संचालक लॉर्ड बुद्धा टीव्ही चॅनलचे महाराष्ट्र भूषण भैय्याजी खैरकर यांचे शुभ हस्तेव भुसावळ शहरातील हृदयरोग तज्ञ



तथा समाजसेवक डॉक्टर राजेश मानवतकर,माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मी मकासरे,लॉर्ड बुद्धा टीव्ही चॅनलचे संचालक सचिन मून,ऑल इंडिया एससी एसटी रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशन झोनल अतिरिक्त सचिव एवं मंडळ अध्यक्ष भुसावळ डिव्हिजनचेसुधीर जंजाळे कोळी समाजाच्या समाज सेविका रूपाली सूर्यवंशी यांच्यासह समाजसेवक विशाल सोळंके,वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे,वंचित बहुजन आघाडीचेयुवाजिल्हाध्यक्ष बाळा पवार,होमगार्ड सुरेश इंगळे,शहर पोलीस स्टेशनचे संदीप बडगे, दिनेश शिखरे,समाज सेविका संगीता भांबरे, समाजसेवक समाधान निकम,अंजुमन खान, गोकुळ पाटील,समाज सेवक सुरेश यशोदे,गुरु चंद्रमणी बुद्ध विहार पदाधिकारी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र हिरकणी कर्तबगारमहिला राष्ट्रीय पुरस्कार -२०२४ ने सहपरिवार सन्मानित करण्यात आले.जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तथा आदर्श शिक्षिका करुणा गायकवाड (धिवार ) यांना यापूर्वी सुद्धा उल्लेखनीय सामाजिक,शैक्षणिक नावीन्यपूर्ण उपक्रम विशेष कार्यामुळे अनेक विविध संस्था,संघटना, कार्यालये यांच्या वतीने पुरस्कार,सन्मान,बक्षिसे मिळालेले आहेत.सदर कार्यक्रमाचे आयोजन अनुश्री महिलाबहूउद्देशिय संस्थेच्या अध्यक्ष जयश्री ताई इंगळे यांनी केले होते.सदर राज्यस्तरीय महाराष्ट्र हिरकणी कर्तबगार महिला राष्ट्रीय पुरस्कार -२०२४मिळाल्या बद्दल करुणा गायकवाड (धिवार )यांचेसर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.सदर पुरस्कार वितरण सोहळ्यास राज्यभरातून पुरस्कारार्थी परिवारासह उपस्थित होते.

# गेवराईत चोरट्यांनी २ लाखाची बॅग पळवली

## मध्यवस्तीत भर दिवसा लुटल्याने खळबळ

**गेवराई ।प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात परळीतील गोळीबार, व्यापाऱ्याचे अपहरण आणि मस्साजोग येथील सरपंचाचे अपहरण करून झालेल्या हत्याची घटना चर्चेत असतानाच, गेवराई येथील बँकेतून घरी जाणाऱ्या शेतकरी राधाकिसन मोकिंदा कोठेकर यांच्या हातातून १ लाख ९९ हजार रुपयांची कापडी बॅग चोरट्यांनी हिसकावून पळवून नेल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.**



याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई शहरातील जुन्या बस स्थानका जवळ राष्ट्रीय महामार्गावरील बुलढाणा अर्बन बँकेची शाखा आहे. या शाखेतून राधाकिसन मुकिंदा कोठेकर आणि त्यांची पत्नी सौ शशिकला कोठेकर राहणार कोल्हेर रोड, गेवराई यांनी आपल्या खात्यातून काढलेले १ लाख ९९ हजार रुपये ची रक्कम घेऊन पशुवैद्यकीय दवाखाना परिसरातून डॉक्टर काळे हॉस्पिटल मार्गे घराकडे निघाले होते. दरम्यान त्यांच्यावर पाळत ठेवलेल्या दोन चोरट्यांनी मोटरसायकलवर येऊन त्यांचा पाठलाग सुरू केला. श्री व सौ कोठेकर पती-पत्नी महात्मा फुले शाळे समोरील, तस्लिम किराणा समोर, मडके यांच्या घराजवळ येताच, पाठीमागून मोटर सायकलवर आलेल्या चोरट्यांनी राधाकिसन कोठेकर यांच्या हातात असलेली १ लाख ९९ हजार रुपयांची पिशवी जोरात हिसकावून पळवून नेली. हातातील रक्कम लंपास झाल्याचे कळताच कोठेकर यांनी आरडाओरड केली मात्र तोपर्यंत चोरटे मोटर सायकलवर पसार झाले. सदर घटना दिनांक १० डिसेंबर रोजी मध्यवस्तीत भर दिवसा १२ ते साडेबारा वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी वरील प्रमाणे गेवराई पोलीस ठाण्यात राधाकिसन मुकिंदा कोठेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध बी एन एस २०२३, कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर आ.नमिता मुंदडा यांच्यामुळे कैकाडी समाजाला मिळाली स्मशानभूमीसाठी १५ गुंठे जागा

## आ.नमितातांई मुंदडा यांचे कैकाडी समाजाने मानले आभार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेला अंबाजोगाईतील कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्यामुळे मार्गी लागला आहे. याबाबत अधिकृत माहिती अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी दिली आहे. याबद्दल कैकाडी समाजाकडून आ.मुंदडा यांचे जाहीर आभार मानण्यात येत आहेत.

याबाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिलेल्या माहितीनुसार सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून कैकाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न प्रलंबित होता, ऊन, वारा, पाऊस यांचा सामना करीत कैकाडी समाजातील बांधवांना समाजाच्या ताब्यातील उघड्या व अपुऱ्या जागेवर पिढ्यान् पिढ्या अंत्यविधी करावा लागत होता, या बाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव यांनी कैकाडी समाजातील इतर बांधवांसह सर्वजणांनी मिळून केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमितातांई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांना प्रत्यक्ष भेटून याप्रश्नी त्यांनी स्वतः लक्ष देण्याची विनंती केली असता, या सर्व मान्यवरांकडून आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याविषयी कैकाडी समाजाचे युवक कार्यकर्ते तथा मी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचा अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव व समाज बांधवांनी १५ गुंठे जागा उपलब्ध व्हावी यासाठी काकाजींच्या मार्गदर्शनानुसार ११ मार्च २०२४ रोजी अर्ज देवून सदरचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मुख्याधिकारी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी व उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुरावा केला. तर आ.मुंदडा यांनी ही शासन दरबारी वेळोवेळी हा प्रश्न मांडला आणि सदर प्रस्तावाबाबत सकारात्मक पाठपुरावा करून रेणुकामाता मंदिर रोड जवळील अंबाजोगाई येथील कैकाडी समाजाच्या स्मशानभूमी साठी सर्व्हे नंबर ६२१/३ मधील १५ गुंठे जागा शासकीय गायरानातून उपलब्ध करून दिली. अखेर मुंदडा कुटुंबियांनी कैकाडी समाजाला दिलेला शब्द खरा व पुर्ण केला. त्यामुळे अत्यंत आवश्यक असलेल्या कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर मार्गी लावल्याबद्दल कैकाडी समाजाकडून अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव यांनी केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमितातांई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांचे तसेच शासन, प्रशासन, प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे जाहीर आभार मानले आहेत.

# आडस येथील कला महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी सज्ज

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील आडस येथील कला महा विद्यालयाची जय्यत तयारी सुरू आहे.कला महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी सज्ज झाले आहे.दि.१४ व दि. १५ डिसेंबर रोजी नॅक मूल्यांकन तपासणी होणारआहे.नॅकमूल्यांकन समितीचे अध्यक्षा केंद्रीय विद्यापीठ कर्नाटक येथील प्रो.करमला पदमश्री, समिती सदस्य म्हणून श्री. शंकराचार्य विद्यापीठ केरळ येथील प्रो फ्रँसिस ए पी अरकल,समिती सदस्य सोहनलाल दव शासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र पदव्युत्तर महाविद्यालय हरियाणाचे प्राचार्य डॉ.विवेक कोहली हे सदस्य म्हणून तपासणी करणार आहेत.श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ.शेख ए.आर. प्राचार्य डॉ.फावडे एम.जीनॅक समन्वयकडॉ.पांचाळ ज्ञानेश्वर यांच्या सह प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह सर्व कर्मचारी नॅक मूल्यांकना साठी सज्ज झाले आहेत.

# राहुल मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दत्त जयंती सामाजिक उपक्रम राबवून साजरी



केज/प्रतिनिधी

केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील कर्तबगार युवक राहुल प्रकाश मुंडे यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद अपघाती निधन झाले आहे.राहुल मुंडे हा कर्तबगार युवा तरूण होता.त्याच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुल मुंडे चा मोठा मित्र परिवार आहे.या सर्व राहुलच्या जिवलगमित्रांनी राहुल मुंडे प्रतिष्ठानची स्थापना केली आहे. राहुल प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिकउपक्रम राबविण्याचा मानस या तरुण युवकांनी राहुल प्रतिष्ठानची स्थापना करताना व्यक्त केलाहोता. याकामी त्यांना एम.डी घुले सर,सुधाकर ढाकणे सर,अशोक भैया तांदळे, गायकवाड सर,मुळे सर, सुर्यवंशी दादा सर, राजसाहेब ढाकणे,गोटू पाळवदे,वैभव केंद्रे,संदीप भुतडा,अशोक घुले,डॉ. विजयकुमार धस,अशोक आंधळे,गोविंद काळे व इतर अनेक मान्यवरांनी समर्थ साथ दिली आहे. याचाच एक भाग म्हणून आज दत्तजयंतीनिमित्ताने शिक्षक कॉलनी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या व पुस्तकाचे वाटप करण्यात आले.सर्वप्रथम दत्तजयंती निमित्ताने पुजन करून व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वह्या व पुस्तकाचे वाटप कार्यक्रम घेण्यात आला.कार्यक्रमाचेअध्यक्ष म्हणून जाधवर मॅडम,मुंडे मॅडम,वाघमारे मॅडम व गायकवाड सर उपस्थित होते.राहुल मुंडे प्रतिष्ठान चा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण वाघमारे,अशोक लांडगे, समर्थ पारखे,ओम केदार, सुनील शिंदे,योगेश गायकवाड,ओम काळे, अजय मैंद व रुद्र तांदळे यांनी परिश्रम घेतले.

# वाल्मिक कराड यांच्या समर्थनार्थ वडवणी कडकडीत बंद

वडवणी ।प्रतिनिधी

जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावर राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत यासाठी आज वडवणी शहर बंद ठेवण्यात आला .

बीड जिल्ह्यात वाढत्या लोकप्रियतेमुळे जनसेवक वाल्मिक आण्णा कराड यांच्यावरील जातीय राजकीय व्दोषापोटी काही राजकीय मंडळीने विनाकारण त्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचं षडयंत्र सुरू केले आहे त्यांच्यावरील खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा खोट्या गुन्ह्याच्या निषेधार्थ आज शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी बंद ठेवण्यात आली आहे.व निषेध रॅली ची सुरुवात चाटे चौक वडवणी येथून सकाळी १०:०० वाजता सुरुवात झाली व ११:३० वाजता वडवणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक

येथे रॅली समाप्त झाली . यावेळी वडवणी नगरपंचायतचे माजी नगरसेवक सतीश बप्पा बडे तसेच युवा नेते संजय भाऊ आंधळे, भास्कर मुंडे, गोरख पवार, विकास आडे,रमेश काका मुंडे, उत्तरेश्वर कागणे आदींनी वडवणी तहसीलदारांना व पोलीस यांना निवेदन देण्यात आले आहे.



# वाल्मिकी कराड यांच्यावरील गुन्हा मागे घेण्यासाठी पाटोद्यात रस्ता रोको

पाटोदा (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारकऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावे तसेच त्यांच्यावर जलद गतीने न्यायालयात खटला चालून त्यांना कठोरात कठोर शासन करावे: त्याच बरोबर परळीची सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्यावरील राजकीय अकासातून लावण्यात आलेला खंडणीचा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा यासाठी पाटोदा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको करण्यात आले यावेळी नामदार धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, वाल्मीक आण्णा कराड तुम्ही आगे बढो हाम तुमारे साथ है च्या घोषणा देण्यात आल्या.



यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे,जेष नेते मधुकर गर्जे,माजी सभापती अनिल जायभाये,अशोक दहीफडे,स्वामी सानप,दादासाहेब बांगर,नामदेव,सानप, चंद्रकांत राख, गणेश खाडेसह पाटोदा व परिसरातील माजी कृषिमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे,आ.पंकजाई मुंडे, वाल्मीक कराड यांचे पाटोदा व परिसरातील बहुसंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# केज येथे ईव्हीएम हटाओ देश बचाओ संविधान बचाओ संदर्भात कॉँग्रेसची बैठक संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.१४ डिसेंबर २०२४ वार शनिवार रोजी जिल्हा कॉँग्रेसच्या वतीने केज येथे ईव्हीएम हटाओ देश बचाओ संविधान बचाओ संदर्भात कॉँग्रेसची बैठक खा.रजनीताई पाटील यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली.विधानसभा निवडणुका नुकत्याच पार पडल्या या निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागल्याने निवडणुका लोकशाही पद्धतीने होत आहेत का ? असा प्रश्न कॉँग्रेसच्या नेत्या खासदार रजनीताई पाटील यांनी बोलताना विचारला. महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात जनतेचा कॉल होता जनभावना विरोधात होती अनेक पोल देखील महायुतीच्या विरोधात होते तरी देखील यापूर्वी कधीही मिळाल्या नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात जागा भाजप व मित्र पक्षाला मिळाल्या.याचा अर्थ ईव्हीएम



मध्ये काहीतरी गडबड आहे. असा प्रश्न उपस्थित केला. ईव्हीएम हटाव देश बचाओ संविधान बचाओ स्वाक्षरी मोहीम भारतीय कॉँग्रेस पक्षाने सुरू केली असून या अभियानाची सुरुवात बीड जिल्ह्यात करण्यात आली आहे.या अभियाना अंतर्गत नगरपालिका,जिल्हा परिषद,पंचायत समिती च्या निवडणुका कॉँग्रेस स्वबळावर लढणार आहे. यावेळी कार्यक्रमाला माजीमंत्री अशोक दादा पाटील,जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,आदित्य पाटील, नवनाथ थोटे कॉँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष मीनाक्षीपांडुळे,अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# मानूर येथे एन. एम. एम. एस. केंद्र स्तरीय सराव परीक्षा संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

छबुआई लिंबाशेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर यांच्या वतीने मानूर केंद्र समूहातील इयत्ता आठवीच्या मुलांची सराव परीक्षा अतिशय उत्साहात घेण्यात आली. आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांची केंद्र सरकारच्या मार्फत एन. एम.एम. एस. शिष्यवृत्ती परीक्षा दरवर्षी डिसेंबर महिन्यात घेण्यात येते.या परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १२ हजार रुपये याप्रमाणे चार वर्ष शिष्यवृत्ती देण्यात येते यावर्षीची एन. एम. एम. एस. मुख्य परीक्षा २२ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न होणार आहे. या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या इयत्ता आठवीच्या वर्गातील मुलांना मुख्य परीक्षेचा एक पूर्व अनुभव घेता यावा म्हणून मानूर केंद्रस्तरीय एनएमएमएस सराव चाचणीचे आयोजन छबुआई लिंबा शेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर यांच्या वतीने १३ डिसेंबर रोजी रेणुका विद्यालय मानूर येथे करण्यात आले होते. या परीक्षेसाठी रेणुका विद्यालय मानूर ,घाटशिळा विद्यालय पारगाव व जि.प. प्रा. शाळा दहिफळेवस्ती या शाळेतील ६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मुख्य परीक्षेसारखेच वातावरण आयोजकांनी मानूर केंद्रस्तरावर निर्माण करत रीं व रीं हे दोन्ही सराव पेपर घेतले. अत्यंत पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा संपन्न झाली,लगेच निकाल घोषित करून विजेत्या सहा विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व फिरोज पठाण सर लिखित अभिनव प्रकाशन पुणे यांचे सुगम गणित व स्पर्धा परीक्षेची पुस्तके विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. सहभागी झालेल्या सर्व शाळांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. सहभागी सर्व ६२ विद्यार्थ्यांना मा. सतीश बडे पी.एस.आय. छ. संभाजीनगर यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे पुस्तक भेट दिले. बक्षीस वितरण सोहळा ३.०० ते ५.०० या वेळेत संपन्न करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. लिंबाशेठ दादा नागरगोजे प्रसिद्ध उद्योगपती अहिल्यानगर, का. भा. खेडकर सर केंद्रप्रमुख मानूर ,पी .जी. पाखरे सर मुख्याध्यापक रेणुका विद्यालय मानूर ,रमेश खेडकर सर ,तळेकर सर घाटशिळा विद्यालय पारगाव , शिवचरित्रकार कैलास तुपे सर, मा.सतीश बडे पी.एस.आय. छ. संभाजीनगर, महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेतील सुप्रसिद्ध लेखक फिरोज पठाण सर ,नेहरकर सर, दिनेश पाखरे सर, दिनेश बडे, एकनाथ लोमटे, पांडुरंग बडे ,अमोल सानप, भारत शिंदे सर, गणेश बडे, सलीम पठाण, दीपक देठे व रेणुका विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. आराध्या विठ्ठल गीते इयत्ता आठवी जि. प. प्रा. शाळा दहिफळेवस्ती या शाळेच्या विद्यार्थिनीने प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांचे कौतुक करत आभार मानले. तुम्ही आज आमच्या उज्वल भविष्यासाठी खूप सुंदर पद्धतीने आम्हाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले. आम्ही सर्व विद्यार्थी सदैव तुमचे ऋणी राहू, असे विचार व्यक्त केले. मोठ्या पिढीने छोट्या पिढीला योग्य दिशा देण्याचे कार्य केले पाहिजे. आज छबुआई लिंबाशेठ दादा नागरगोजे मातृत्व सामाजिक प्रतिष्ठान मानूर च्या सर्व सदस्यांनी स्तुत्य उपक्रम हाती घेत मुलांना उत्तम संधी दिली मी त्यांचे विशेष कौतुक करतो. येणाऱ्या काळात आपल्याकडून विद्यार्थी हितांसाठी असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील अशी आशा बाळगतो; असे मत मानूर केंद्र समूहाचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख का. भा. खेडकर सर यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून येणाऱ्या काळात आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थी यांना बळ देण्याचं कार्य घडवून आणले जाईल; तसेच आपल्या परिसरातून उद्याचे अधिकारी निर्माण व्हावेत या हेतूने हे प्रतिष्ठान भविष्यात कार्य करत राहील. विद्यार्थी मित्रांनो तुम्ही खूप अभ्यास करा, कष्ट करा व स्वतःच्या ज्ञानाची पातळी वाढवून आई-वडिलांच्या जीवनाचे सार यशस्वी करा. आम्ही सर्वजण तुमच्यासोबत आहोत.तुमच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !असे मत दिनेश पाखरे सर यांनी व्यक्त केले. अभिनव प्रकाशन पुणे यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील



तीन लाख प्लस मुलांपर्यंत आपली पुस्तके पोहचवणारे स्पर्धा परीक्षेतील महाराष्ट्राचे नामवंत लेखक फिरोज पठाण यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना आपल्या प्रेरणादायी व अमृततुल्य शब्दांनी मंत्रमुग्ध करत वाहवा मिळवली. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक सकारात्मक उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर मांडत विद्यार्थ्यांच्या विचार, संशोधन व जिज्ञासू वृत्तीला जागे करण्याचा प्रयत्न केला. आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी शेतकऱ्यांच्या लेकरांनो शिका कष्ट करा ज्ञान मिळवा व स्वतःचे जीवन समृद्ध बनवा हे प्रतिष्ठान इथून पुढे तुमच्या सर्वांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असे मत पी.एस.आय. सतीश बडे साहेब यांनी व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या. छबुआई लिंबाशेठ दादा मातृत्व सामाजिक प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांचे मी कौतुक करतो, धन्यवाद देतो. आपण खूप सुंदर कार्य हाती घेतले आहे याचा आम्हाला आनंद वाटतो; असे मत विठ्ठल शिरसाट सर यांनी व्यक्त केले. यानंतर विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक आराध्या विठ्ठल गीते जि. प. प्रा.शाळा दहिफळे वस्ती या विद्यार्थिनीने सर्वाधिक १०६ गुण घेत मिळवला, द्वितीय क्रमांक साक्षी लिंबाजी शिरसाट दहिफळेवस्ती, तृतीय क्रमांक शिवांजली पिंपळेश्वर मानुरकर दहिफळेवस्ती ,चतुर्थ क्रमांक चैतन्य बडे रेणुका विद्यालय मानूर, पाचवा क्रमांक साक्षी रामनाथ कदम दहिफळेवस्ती, सहावा क्रमांक खेडकर निशा भाऊसाहेब घाटशिळा विद्यालय पारगाव यांनी मिळवला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष पप्पू शेठ बडे,दिनेश पाखरे सर, फिरोज पठाण सर, पी.एस.आय. सतीश बडे साहेब,पी.एस. आय.विजय बडे,सोमनाथ पाखरे,बाबादेव बेळगे,अशोक दहिफळे,बाळू पवार,संदीप बडे,भारत साबळे यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेला हा उपक्रम रेणुका विद्यालय मानूरचे प्राचार्य पी.जी. पाखरे सर यांनी अतिशय व्यवस्थित नियोजनाने यशस्वी केला.या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शिवचरित्रकार कैलास तुपे सर यांनी करत रंगत वाढवली.

## शिरूर तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्याची मागणी

### भाजपा भटके विमुक्त आघाडीचे सतिश भोसले यांचे पोलिसांना निवेदन

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील अवैध धंदे,जुगाराचे अड्डे आणि विषारी दारूची होणारी विक्री बंद करण्यात यावी अशी मागणी भाजपा भटके विमुक्त आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष सतिश भोसले यांनी केली आहे.१३ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ संपूर्ण बीड जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात येत असताना देखील शिरूर शहरासह तालुक्यातील अवैध धंदे सुरूच होते.

शिवाय विषारी दारूची देखील मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.त्यामुळे शहरासह तालुक्यातील सर्व प्रकारचे अवैध धंदे पोलीस प्रशासनाने बंद करावे अन्यथा लोकशाही मार्गाने भाजपा भटके,विमुक्त आघाडीच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा देखील सतिश निराळे भोसले यांनी दिला आहे.

शिरूर तालुक्यातील अवैध धंदे,जुगाराचे अड्डे आणि विषारी दारूची होणारी विक्री बंद करण्यात यावी अशी मागणी भाजपा भटके विमुक्त आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष सतिश भोसले यांनी केली आहे.१३ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ संपूर्ण बीड जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात



## वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ आज रस्ता रोकोसह शिरूर बंद

मानूर ।प्रतिनिधी


ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्यावर राजकीय दबावापोटी दाखल करण्यात आलेला खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा यासाठी आज जिजामाता चौकात रास्ता रोको करून बंद पाळण्यात येणार आहे.वाल्मीक कराड यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याची कसलीही शहानिशा न करता केवळ राजकीय द्वेशापोटी त्यांना बदनाम करण्याच्या उद्देशाने सदरील गुन्हा दाखल करण्यात आला असून तो मागे घेण्यात यावा यासाठी शहरातील जिजामाता चौकात सकाळी अकरा वाजता रास्ता रोको करण्यात येवून शहर शांततेच्या मार्गाने बंद ठेवण्यात येणार असल्याचे विश्वास नागरगोजे,रवि आघाव,धर्मराज जायभाये,सतिश बडे,महेश ढाकणे,प्रल्हाद ढाकणे,केशव खेडकर,बबन दहिफळे,भगवान सानप,देविदास जायभाये,सावळेराम जायभाये आदींसह कराड समर्थकांनी निवेदनाद्वारे कळविले आहे.

## तलवाडयात श्री दत्त जयंती निमित्त हभप मधुकर म.डोईफोडे यांचे

### किर्तन व महाप्रसादाचे आयोजन

शेख आतिख/तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील श्री पावन दत्त मंदिर संस्थान याठिकाणी गुरूवर्य हभप वै.माऊली महाराज चाकरवाडीकर व हभप वै.मच्छिंद्र महाराज पैठणकर यांच्या कृपेने आणि श्रीराम मंदिर संस्थानचे मठाधिपती हभप कृष्णा महाराज गोसावी यांच्या आशिर्वादाने श्री दत्त जयंती निमित्त एकदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून रविवार दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत हभप मधुकर महाराज डोईफोडे यांचे किर्तन व जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. श्री दत्त जन्मोत्सव सोहळयाचे हे २४ वे वर्षे असून या कार्यक्रमाचा लाभ तलवाडा व परिसरातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे. तलवाडा



येथील श्री पावन दत्त मंदिर संस्थान याठिकाणी दरवर्षी भव्यदिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत होते. परंतु लॉकडाऊन पासून श्री दत्त जयंती निमित्त एकदिवसीय किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करून महाप्रसादाचे आयोजन केले जात आहे. पुढील वर्षी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त भव्यदिव्य किर्तन महोत्सव आयोजित करून श्री दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा केला जाणार आहे. तरी यावेळी श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या हभप मधुकर महाराज डोईफोडे यांचे किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी तलवाडा व परिसरातील भाविकांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन त्वरिता तरूण मंडळ व पावन दत्त मंदिर संस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### डिसेंबर अखेरपर्यंत निधी वाटप करण्यात आला नाही तर दिव्यांग बंधू सोबत

## मुख्य अधिकारी यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल शेख राजू

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई येथील दिव्यांग यांच्या विविध प्रकारच्या मागण्यासाठी तसेच थकीत पाच टक्के अपंग निधी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे गेवराई नगरपरिषद याच्याकडे वारंवार दुर्लक्ष करत असल्याच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष शेख राजू यांनी सांगितले तसेच जोपर्यंत नगरपरिषद निधी वाटप करत नाही तोपर्यंत आमचा लढा चालू राहील असा त्यांनी सांगितले होते या बाबत अधिक माहिती अशी की शासनाच्या निर्णयानुसार आरक्षित असलेल्या नगरपरिषदचे वार्षिक उत्पन्नातून पाच टक्के निधी हा दिव्यांग यांना देण्यात येते परंतु अनेक दिवसांपासून नगरपरिषद याच्याकडे दुर्लक्ष करत आहे तसेच संपूर्ण पाच टक्के निधी समप्रमाणे तात्काळ वाटप करण्यात यावे यासाठी दिनांक ११ डिसेंबर रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने दिव्यांग बंधू सोबत मुख्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले दिलेल्या निवेदनात शेख राजू म्हणाले की दिनांक ३ सप्टेंबर रोजी आम्ही सर्व दिव्यांग बंधू सोबत नगरपरिषद समोर आमरण उपोषणाला बसलो होतो त्या वेळेस नगर परिषदेचे मुख्य तथा प्रशासक अधिकारी विक्रम मांडूरके यांनी लेखी आश्वासन देत आमचा उपोषण सोडला होता उपोषण सोडता वेळेस दिलेल्या पत्रात मुख्य अधिकारी यांनी थकीत निधी डिसेंबर अखेरपर्यंत दिव्यांगांच्या खात्यात वर्ग करण्यात येईल असा लेखी पत्र आम्हाला दिली होती तसेच दोन हजार रुपये आजचे आज आम्ही अपंग बंधू यांच्या खात्यात जमा करत आहात त्यांनी सांगितल्याप्रमाणे दिव्यांगांना दोन हजार रुपये मिळाले तसेच थकित रक्कम डिसेंबर अखेरपर्यंत देण्याचे लेखी आश्वासन दिले होते तसेच दिव्यांगांना घरकुल योजनेचा लाभ उद्योग धंद्याकरिता जागा व गळे देण्यात यावे तसेच दिव्यांगांना घरपट्टी नळपट्टी मध्ये सवलत देण्यात यावे दिव्यांगांना सर्वस्वयुक्त दिव्यांग भवन उभारण्यात यावे, विविध प्रकारचे शासनाचे लाभ दिव्यांगयांना देण्यात यावे करिता मागणी केली होती जोपर्यंत आमचे मागणे मान्य होत नाही तोपर्यंत आम्ही



उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे ठामपणे प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष राजू भाई व त्यांच्या नेतृत्वाखाली उपोषणाला बसलेले दिव्यांग बंधू यांनी सांगितले होते या दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा नेते यशराज बदामराव पंडित यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण करता यांचे मागण्या समजून घेतले होते व नगरपरिषद चे मुख्य अधिकारी प्रशासक विक्रम मांडूरके यांच्याशी चर्चा करून दिव्यांग यांचे मागण्या योग्य असून तात्काळ मार्गी लावण्याचे आग्रही विनंती त्यांनी मुख्य अधिकारी यांना केली होती त्यानंतर लगेचच मुख्य अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे एक टप्पा निधी प्रति दिव्यांग यांना दोन हजार रुपये देण्यात आले तसेच मार्च ३१ पासून ते डिसेंबर ३१ पर्यंत चे थकीत निधी आम्ही लवकरात लवकर दिव्यांगांना वाटप करू असे लेखी आश्वासन नगरपरिषद चे मुख्य अधिकारी तथा प्रशासक यांनी दिले होते राज्यात विधानसभा निवडणुकीची लगबग बघता आम्ही व दिव्यांग बंधू यांनी प्रतीक्षा केली असून तिसऱ्या टप्प्याची हि कालावधी जवळ आहे आपण लेखी आश्वासन दिले प्रमाणे लवकरात लवकर दिव्यांग बंधूंना दोन टप्पे निधी वाटप करण्यात यावे नसता दिव्यांगांना घेऊन आम्ही प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने माननीय बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद चे मुख्य अधिकारी तथा प्रशासक यांच्या दालानासमोर ठिय्या आंदोलन करण्याचे इशाराही यावेळी देण्यात आला यावेळी मोठ्या संख्येने दिव्यांग बंधू उपस्थित होते

### कोणत्या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे होतात

## केस पांढरे, कशी घ्यावी काळजी ? - डॉ कपिल जुमले

**पुणे।प्रतिनिधी**

**केस पांढरे होणे केवळ सौंदर्यावर परिणाम करत नाही तर आत्मविश्वासावरही परिणाम करते. परंतु हे का घडते आणि यामागे नेमकी कोणती कारणे असतात, याबद्दल अनेकांना माहिती नसते.चुकीची जीवनशैली, अपूर्ण आहार, अनुवांशिकता किंवा काही विशिष्ट पोषणतत्त्वांची कमतरता यामुळे अकाली केस पांढरे होण्याची समस्या उद्भवते.**



व्हिटॅमिन सीची कमतरता:

अकाली पांढरे केस होण्याचे प्रमुख कारण म्हणजे शरीरातील व्हिटॅमिन सी ची कमतरता. व्हिटॅमिन सी, ज्याला एस्कॉर्बिक सिड म्हणतात. शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे कोलेजन तयार होते. जे केसांना मजबूत बनवण्याबरोबरच त्यांना पांढरे होण्यापासून रोखते. तसेच यामुळे केस गळती, कोरडेपणा आणि इतर समस्या कमी होतात. व्हिटॅमिन सीची कमतरता असलेल्या लोकांमध्ये केस पांढरे होण्याची शक्यता अधिक असते.

व्हिटॅमिन सीची कमतरता कशी टाळायची?

व्हिटॅमिन सी सहज उपलब्ध असणाऱ्या फळे आणि भाज्यांमध्ये आढळते. जर तुम्ही दररोज सुमारे ४ ग्रॅम व्हिटॅमिन सीचा समावेश आहारात केला, तर डोक्यामधील रक्त परिसंचरण सुधारेल ज्यामुळे केसांच्या समस्या कमी होण्यास मदत होईल. व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असलेले पदार्थ खाल्ल्यास केसांची गुणवत्ता सुधारते आणि अकाली पांढरे होण्यापासून बचाव होतो.

### कोणते पदार्थ खावे?

व्हिटॅमिन सीसाठी फळांमध्ये संत्री, पेरू, द्राक्षे, ब्लॅकबेरी आणि पपई खाणे फायदेशीर ठरते. भाज्यांमध्ये ब्रोकोली, पालक, टोमॅटो आणि कोबी यांचा समावेश करावा. हे पदार्थ नियमित आहारात असतील तर केसांना पोषण मिळेल आणि केस पांढरे होण्याची प्रक्रिया थांबेल.तरुण वयात केस पांढरे होणे टाळण्यासाठी योग्य आहार आणि जीवनशैली महत्त्वाची आहे. व्हिटॅमिन सी समृद्ध पदार्थांचा आहारात समावेश करा आणि तुमच्या केसांना योग्य पोषण द्या.

## आमदार अमोल पाटील यांचा गृहरक्षक दलाकडून सत्कार



पारोळा नागपूर (लोकदिशा न्युज)

पारोळा :- येथे ग्रह रक्षक दलाकडून एरंडोल - पारोळा विधानसभा मतदार संघाचे आमदार अमोलदादा पाटील यांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून करण्यात आला. आम्हीं उन्हात पावसात थंडीत व निवडणुकीच्या काळात इतर प्रसंगी राज्यात, इतर राज्यात आपले कर्तव्य इमाने ईतबारे निभावतो गृह रक्षक दलाच्या जवानांनी आपले मनोगत व्यक्त करतांना बोलून दाखविले तसेच, शासनाकडून ६७० रुपये रोज मानधन मिळत होते. या शासनाने आम्हाला १२८३ रुपये मानधन मिळवून दिले आहे. म्हणून आनंदाचे वातावरण असून गृह रक्षक दल यांना बाराही महिने काम मिळावे म्हणून अशी व्यथा व्यक्त केली .त्यावर आमदार साहेबांनी शासन आपल्या सोबत असून मुख्यमंत्री साहेबांकडे पाठपुरावा करू महाराष्ट्रातील गृह रक्षक दल यांच्या बद्दल सहानुभूती व्यक्त केली .सत्कार करतांना गृहरक्षक दलातील प्रभाकर पाटील ,अरुण पाटील, मयाराम पाटील, नंदू राजहंस, छोटू कासार, अभय पाटील, पंजाबराव बोरसे , वासुदेव भोई, विलास शिंदे, सुनील माळी, भरत कोळी, मिलिंद आदींनी सत्कार केला. व ७८ वा वर्धापन दिवस बाबत आमदार अमोलदादा पाटील यांनी शुभेच्छा दिल्यात.